**मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई**
**प्रशासकीय इमारत, तिसरा मजला,**
**वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.**

# <u>देकार सुचना</u>

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीचे सन २०२४-२५ ते २०२५-२६ या कालावधीकरिता आर्थिक पत्रकांचे अंतर्गत लेखापरीक्षण करणे, बाजार समितीच्या दरमहाच्या उत्पन्नाची आकारणी व वसुली याची तपासणी व शहानिशा करणे, बाजार समितीमार्फत अदा करण्यात येणा-या देयकांची तपासणी करणे, केंद्र शासन व राज्य शासनामार्फत विविध कर कायदयांतर्गत करण्यात येणा-या बदलांनुसार कामकाजात बदल सुचविणे, व कायदयातील तरतुदींचा अनुपालन अहवाल सादर करणे, बाजार समितीच्या दैनंदिन कामकाजामध्ये सुसूत्रता व सुधारणा करण्याकरीता उपाययोजना सुचविणे व त्याच्या अंमलबजावणीची खातरजमा करणे इत्यादी कामकाज करण्याकरिता खालील पात्रता धारण करणा-या इच्छूक सनदी लेखापालांकडून देकार मागविण्यात येत आहेत.

१. अर्ज करणा-या सनदी लेखापालांची भागीदारी संस्था असावी.
२. भागीदारी संस्थेस कमीत कमी १० वर्षाचा लेखापरीक्षणाचा अनुभव असावा.
३. बाजार समितीचे लेखापरीक्षण केलेले असल्यास त्यास संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.

तरी इच्छूक सनदी लेखापालांनी त्यांचे देकार बंद लिफाफ्यामध्ये दिनांक १२.९.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वा तत्पूर्वी मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई प्रशासकीय इमारत, तळमजला येथे सादर करावेत. याबाबत अधिक माहिती हवी असल्यास मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला येथील लेखाशाखेशी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते ४.०० या वेळेत संपर्क साधावा.

सचिव सभापती
मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई

Scanned with OKEN Scanner